नियमीत दिवाणी मुकदमा क्र.०७/२०२० मधील नि. ३८ वरील आदेश
{श्री. देवेंद्र तोटकेकर व.२ –वादी वि. दशरथ चव्हाण व.४ –प्रतिवादी }

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. मुळ वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्यावर कैफियत दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द ''प्रतिदाव्यावर कैफियत नाही'' असा झालेला आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी म्हणून दाखल केला आहे. मुळ वादी यांचे म्हणणे की, वादीने दाखल केलेल्या दाव्याचे कामी मुळ प्रतिवादींविरुध्द ताकीद आदेश देण्यात आला होता. परंतु मुळ प्रतिवादी यांनी सदर आदेशाचा भंग करुन न्यायालयाचा अवमान करुन बेकायदेशीर बांधकाम चालू ठेवले होते. त्याबाबत मुळ वादी व त्याचे मुलाने विचारणा केली असता मुळ प्रतिवादी यांनी मुळ वादीचे मुलास मारहाण केली व त्यामध्ये त्यांना अस्थीभंगासारखी दुखापत झाली. त्यामुळे मुळ वादी यांना प्रतिदाव्यावर मुदतीत आपली कैफियत देता आली नाही. कैफियत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणताही हलगर्जीपणा नव्हता. त्यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांना आपली बाजु मांडता येणार नाही व त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजुर करुन प्रतिदाव्याचे कामी त्यांना बचाव मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती मुळ वादी यांनी केली आहे.

२. मुळ प्रतिवादीने प्रस्तुतच्या अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज अनिवार्य तरतुदीस धरुन नाही. मुळ प्रतिवादी यांनी कोणत्याही आदेशाचा भंग केला नाही. अर्जात दिलेले कारण खोटे व खोडसाळ आहे. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेमधील कोणत्या तरतुदीखाली दाखल केला आहे याचा उल्लेख अर्जात नाही. तरी अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती मुळ प्रतिवादी यांनी केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द कायम व आज्ञार्थी ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी दिनांक २९/१/२०२० रोजी दाव्याचे कामी हजर होवून आपली कैफियत तसेच प्रतिदावा दाखल केला आहे. त्यानंतर मुळ वादी यांनी प्रतिदाव्यावर आपली कैफियत मुदतीत न दाखल केल्याने त्यांचेविरुध्द प्रतिदावा विना कैफियत चालविणेबाबत आदेश झालेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०८, नियम १ अन्वये मुळ वादी यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. मुळ वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे. मुळ वादी यांनी प्रस्तुतचा मुळ दावा कायम व आज्ञार्थी ताकीद आदेशासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे मुळ वादी यांची प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करुन घेतल्यास दोन्ही पक्षांमध्ये असलेला वाद गुणदोषावर निर्णित करण्यास मदतच होणार आहे. मुळ वादी प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करुन घेतल्याने मुळ प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निष्कर्षापर्यंत मी आले आहे. सबब, प्रस्तुत मुळ वादी यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल.

## आदेश

१. मुळ वादी यांनी मुळ प्रतिवादी यांना रक्कम रुपये १००/- (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर मुळ वादी यांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मुळ वादी यांनी मुळ प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांची प्रतिदाव्यावरील कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

सही/-

(अ. जो.बाचुलकर)

ठिकाण : कुडाळ. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दि. ०१/१२/२०२१ कुडाळ.